महत्वाचे

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती.**

क्रमांक: संगबाअवि/८/बी-९६३/२०२२
दिनांक: ०९/०७/२०२२

Date: 11/07/2022

प्रति,

प्राचार्य,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी
संलग्नित सर्व महाविद्यालये

**विषय :- विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत... सत्र २०२२-२३**

महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, इयत्ता १२ वी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, सत्र २०२२-२३ च्या प्रवेश प्रक्रियेची सुरुवात करण्यात येणार आहे. विद्यार्थी प्रवेश लक्षात घेता खालील सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१. प्रवेश प्रक्रिया शैक्षणिक नियमिका (ऍकेडेमिक कॅलेंडर) २०२२-२३ नुसार करण्यात यावा.
२. एकस्तर परिनियम क्रमांक ५/२०१९ मधील तरतुदीनुसार माहितीपुस्तिका, अनुक्रमणिकेसह व किंमतीसह प्रसिद्ध करणे अनिवार्य आहे.
३. विद्यापीठाचे अध्यादेश / निदेशातील तरतुदीनुसार प्रवेश पात्रता तपासून व मंजूर प्रवेश क्षमतेतील रिक्त जागी प्रवेश देण्यात यावा.
४. प्रवेश शक्यतो प्राधान्याने 'ऑनलाईन' करण्याचा प्रयत्न करावा. प्रवेश अर्जाकरिता गुगल फॉर्म, ई-मेल, किंवा अन्य डिजीटल उपलब्ध साधनांचा वापर करून प्रवेश प्रक्रिया राबविली जाऊ शकेल.
५. जर एखाद्या विद्यार्थ्याकडे ऑनलाईन प्रक्रियेत भाग घेण्याचे साधन उपलब्ध नसेल तर महाविद्यालयांनी अशा विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण करण्यास मदत करावी.
६. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील कलम ८६ मधील तरतुदीनुसार समाजाच्या दुर्बल घटकासाठी असलेल्या राज्य शासनाच्या, आरक्षण विषयक धोरणानुसार संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यामधील सर्व अभ्यासक्रमांना शासनाने वेळोवेळी दिलेल्या शासन आदेश/शासन निर्णय/परिपत्रक यामधील सापेक्ष गुणांच्या आधारावर विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा. प्रवेशाकरिता पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची यादी सूचना फलकावर व महाविद्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी. प्रवेश प्रक्रिया पारदर्शक असावी.
७. विद्यापीठ अधिसूचना क्र. ४२/२०२२ दि. २८.४.२०२२ नुसार विद्यार्थ्यांकडून शुल्क घेण्यात यावे. अतिरिक्त शुल्क घेण्यात येऊ नये.
८. ज्या महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयातील विषय/अभ्यासक्रमांना विद्यापीठाद्वारा सत्र २०२२-२३ चे संलग्नीकरण अर्ज ऑनलाईन पद्धतीने सादर केलेले आहे अशा महाविद्यालयांनी सत्र २०२२-२३ ची प्रवेश प्रक्रिया सुरू करावी. संलग्नीकरणाशिवाय प्रवेश केल्यास त्या विद्यार्थ्यांचे नामांकन होणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील.
९. दि.२८.१२.२०२० रोजी झालेल्या सभेचे कार्यवृत्त क्र.६१(२) खालीलप्रमाणे आहे.

"परिषदेने असे निदेश दिले की, सर्व महाविद्यालयांनी त्यांच्या महाविद्यालयाच्या माहितीपुस्तिकेतील माहिती वेबसाईटवर उपलब्ध करून द्यावी. ज्या विद्यार्थ्यांना वेबसाईटवरची माहिती हार्ड कॉपी मध्ये पाहिजे असेल तर त्या विद्यार्थ्याला ती माहिती पैसे देऊन महाविद्यालयाकडून उपलब्ध करून घेता येईल. त्यामुळे इतर विद्यार्थ्यांवर त्याचा आर्थिक भार येणार नाही. महाविद्यालयाने विद्यार्थ्यांच्या प्रवेश आवेदनपत्राची किंमत २० रुपयापेक्षा जास्त घेऊ नये तसेच विद्यार्थ्यांच्या प्रवेशासंदर्भात शासनाच्या आरक्षण विषय धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी."

**सर्व महाविद्यालयांना विनंती करण्यात येते की, वरील व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयाचे / सूचनेचे काटेकोरपणे पालन करून प्रवेशाबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.**

आदरपूर्वक,

आपला विश्वासू,

कुलसचिव
संत गाडगे बाबा
अमरावती विद्यापीठ.

**प्रतिलिपी माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव:-**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

Scanned with CamScanner

**महत्वाचे**
**कालमर्यादीत**

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती.

क्रमांक:संगाबाअवि/८/सी- 1369/२०२२
दिनांक: १६/०९/२०२२

Deshmukh Mahavidyalaya,
Shivaji Nagar Amravati 444603 (M.S.)
Inward No. ______
Date: ______ Sign ______

प्रति,

प्राचार्य,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी
संलग्नित सर्व कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये.

**विषय :- संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये उशिरा प्रवेशाची प्रक्रिया पुर्ण करण्याची अंतिम तिथीबाबत.**

संदर्भ :- १.विद्यापीठ पत्र क्र.संगाबाअवि/८/सी-११३६/२०२२, दि.५.८.२०२२
२.विद्यापीठ पत्र क्र.संगाबाअवि/८/सी-११८८/२०२२, दि.१२.८.२०२२
३.विद्यापीठ पत्र क्र.संगाबाअवि/८/सी-१३०८/२०२२, दि.२.९.२०२२

महोदय,

उपरोक्त संदर्भाकीत विद्यापीठ पत्र क्र.३ अन्वये विद्यार्थ्यांचे उशिरा प्रवेश प्रक्रियेची अंतिम तिथी **दि. १५ सप्टेंबर, २०२२** पर्यंत मुदत वाढ देण्यात आली होती.

परंतु महाविद्यालयाची उशिरा प्रवेशाची अंतिम तिथी वाढवून देण्याबाबतची मागणी लक्षात घेता, परिक्षांचे निकाल व इतर बाबीवर विचार केल्याने मा.कुलगुरुंनी सर्व पदवी / पदव्युत्तर (पदवी व पदवीका ) अभ्यासक्रमाकरीता उशिरा प्रवेशासाठी विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन अंतिम तिथी **दि. २६ सप्टेंबर, २०२२** पर्यंत वाढवून देण्याची मान्यता दिली आहे.

यानुसार सर्व संलग्नित महाविद्यालयांनी सत्र २०२२-२३ करिता उशिरा प्रवेश प्रक्रिया ( विद्यापीठ शैक्षणिक विभाग व ज्या अभ्यासक्राचे प्रवेश केंद्रीय पध्दतीने होतात ते वगळून) **दि.२६ सप्टेंबर, २०२२** पर्यंत पुर्ण करावी.

**सर्व महाविद्यालयांनी वरील सुचनेचे काटेकोरपणे पालन करुन प्रवेशाबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.**

**ज्या अभ्यासक्रमांची शासनाद्वारा CET परीक्षा घेण्यात आलेली आहे. त्या अभ्यासक्रमाबाबत शासन निर्णयानुसार प्रवेशासंबंधीची कार्यवाही होईल.**

आदेशान्वये.

आपली विश्वासू,

**उपकुलसचिव (म.वि.)**
संत गाडगे बाबा
अरावती विद्यापीठ.

**प्रतिलीपी माहीती व योग्य त्या कार्यवाहीस्तव:-**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

I/Pravesh

Scanned with CamScanner